# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.10.2025** **वार- सोमवार**

---

**<u>आरक्षणसोडत</u>**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आज २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत मुंबईत झाली. २४७ नगर परिषदांमधल्या ३३ अनुसूचित जातींसाठी, ११ अनुसूचित जमातींसाठी, ६७ ओबीसींसाठी आरक्षित असून उर्वरित १३६ नगर परिषदांमधलं नगराध्यक्ष पद खुल्या गटातल्या उमेदवारांना मिळतील. १४७ नगर पंचायतींपैकी १८ अनुसूचित जातींसाठी, १३ अनुसूचित जमातींसाठी, ४० ओबीसींसाठी आरक्षित आहेत. नगर पंचायतींमधल्या उर्वरित ७६ जागांवर खुल्या प्रवर्गातून नगराध्यक्ष निवडून येतील. सर्व गटातल्या निम्म्या जागा महिलांसाठी राखीव आहेत.

**<u>पुणे अन्न औषध प्रशासन</u>**

अन्न आणि औषध प्रशासनाने राज्यातल्या नागरिकांना आणि औषध विक्रेत्यांना खोकल्यावरील 'कोल्ड्रिफ सिरप' या औषधाचा वापर तातडीने थांबवण्याचं आवाहन केलं आहे.मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये या औषधाच्या सेवनानंतर काही मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहेराज्याच्या 'एफडीए चे औषध नियंत्रक डी. आर. गहाने यांनी ही तातडीची सूचना जारी केली

आहे. कोणत्याही संशयास्पद औषध साठ्याची माहिती १८००२२२३६५ या टोल-फ्री क्रमांकावर कळवण्याचं आवाहन पुणे ‘एफडीए’ नं केलं आहे.

**<u>महाआरोग्य शिबिर उद्घाटन</u>**

महिलांचे आरोग्य हे समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचे मूळ आहे. सशक्त स्त्री हीच सशक्त कुटुंब आणि सशक्त समाज घडवत असल्याचे प्रतिपादन पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी केले. महापालिका आरोग्य विभागाच्या वतीनं आयोजित 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानां'तर्गत महाआरोग्य शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या शिबिरात महिलांच्या शारीरिक, मानसिक आणि पोषणात्मक आरोग्याविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

**<u>जनजागृती</u>**

लायन्स क्लब ऑफ पुणे सुप्रीम, ईको-फ्रेंड्स, कोथरूड तसंच विविध स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्यासाठी बाणेरमध्ये जनजागृती फेरीचं आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. रुपाली करवा आणि डॉ. ज्ञानराज चौधरी यांनी नागरिकांना मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन केले.

**<u>पुणे जिल्हा परिषद</u>**

एकल महिलांच्या सक्षमीकरणाचा पहिला प्रयोग पुणे जिल्ह्यातल्या खेड तालुक्यात राबविण्यात आला . एकल महिलांना शासनाच्या विविध विभागांच्या योजनांच्या लाभाबाबत माहिती देण्यासाठी पुणे जिल्हा परिषद, खेड तालुका प्रशासन विभाग आणि ग्रामपंचायत वाडा यांच्या वतीने हा उपक्रम घेण्यात आला.हा प्रयोग राज्याला रोलमॉडेल म्हणून देणार असल्याचं प्रतिपादन पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी यावेळी केलं.

**<u>पुणे मेट्रो</u>**

पुणे मेट्रोचा १० कोटी प्रवासी संख्येचा टप्पा पूर्ण झाला आहे. मेट्रोला सुरुवात झाल्या पासून ६ मार्च २०२२ ते ४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मेट्रोने १० कोटी प्रवाशांची यशस्वीरित्या वाहतूक केली आहे.पुणे मेट्रोच्या सेवेत टप्प्याटप्प्याने झालेल्या विस्तारामुळे प्रवासी संख्येत सातत्याने मोठी वाढ झाली आहे.

**<u>खादी प्रदर्शन</u>**

महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने ९ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत पुण्यात,क्वार्टर गेट इथंल्या पुणे गोवन इंस्टिट्यूट, मध्ये येथे खादीच्या प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>पुणे बुक फेअर</u>**

पुणे बुक फेअर 2025 अर्थात पुणे पुस्तक जत्रा या पुस्तक प्रदर्शनाला येत्या 30 ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. प्रदर्शनाचं  यंदा 23 वे वर्ष असून, हे प्रदर्शन 2 नोव्हेंबरपर्यंत आपटे रस्त्यावरील सेंट्रल पार्कमध्ये विनामूल्य पाहता येणार आहे.  प्रदर्शनात व्याख्याने, चर्चासत्र, परिसंवाद, होणार आहेत.

**<u>मराठीभाषा</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यांच्या सहभागानं ३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान ‘अभिजात मराठी भाषा सप्ताह’   साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत आज पत्रास कारण की, प्रिय विद्यार्थी मित्रांनो’  या सादरीकरणातूनविविध भावभावना व्यक्त करण्यात आल्या. पत्रपेटी, गावातील कट्टा आणि पोस्टमनची सायकल या अर्थपूर्ण नेपथ्याने कार्यक्रमाचे भावविश्व अधिक जिवंत केले.

**<u>क्रिकेट</u>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या 2025-26 या वर्षीच्या टी-ट्वेंटी क्रिकेटसाठी महाराष्ट्र क्रिकेट संघाने पुण्यात वरिष्ठ महिला गटाच्या संघाची घोषणा केली आहे. या महिला संघाचे नेतृत्व कोल्हापूरची अनुजा पाटील करणार आहे तर, खुशी मुल्ला, तेजल हसबनीस, किरण नवगिरे, ईश्वरी सावकर या पुण्याच्या महिला क्रिकेटपटूनाही महाराष्ट्राच्या संघात स्थान मिळाले आहे. आठ ऑक्टोबर पासून नागपूर मध्ये होणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्राचा पहिला सामना तामिळनाडू संघाविरुद्ध असेल.

**<u>हवामान</u>**

आपुणे आणि परिसरात आज कमाल तापमानात वाढ झाली. कमाल तापमान ३१ तर किमान तापमान १९ अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. तापमानात उद्या फारसा बदल संभवत नसून, पावसाच्या हलक्या सरींची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**